**मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८**
**महाराष्ट्र अधिनियम क्र. नऊ १९९०**
**अन्वये केलेल्या सुधारणाप्रमाणे जास्त धरलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा मंजूर करण्याची कार्यपध्दती..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**परिपत्रक क्र. मुद्रांक–१०९०/प्र.क्र. २४५/म–१**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : २६ जून १९९०**

**प रि प त्र क :–**

महाराष्ट्र अधिनियम क्र. नऊ-१९९० अन्वये, मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या अनुसूची एक मधील अनुच्छेद २५(ड) मध्ये दिनांक ७/२/१९९० पासून सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, निवासी उपयोगाकरिता (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये, नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केली असल्याचे मानण्यात आलेल्या सहकारी संस्थेने केलेले किंवा तिच्या नांवे करण्यात आलेले अभिहस्तांतरणपत्र (Conveyance) (२) महाराष्ट्र मालकी हक्काच्या प्लॅटसूबाबत (ते बांधण्यात प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवव्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्यासंबंधी) अधिनियम, १९६३ किंवा महाराष्ट्र बेश्म (Apartment) मालकी अधिनियम, १९७० यांच्या तरतूदी लागू होत असलेले, अभिहस्तांतरण किंवा विक्री करारपत्र, (३) सहकारी गृहनिर्माण संस्थेने तिच्या पत्त्यांना हस्तांतरण केलेले शेअर्स किंवा (४) संस्थेच्या सदस्याने दुसऱ्या सदस्याच्या केलेले शेअर्सचे हसतांतरण या व्यवहारातील दस्तऐवजावर मिळकतीच्या खऱ्या बारमुलयावर आधिारित मुद्रांक शुल्काचे सवलतीचे दर पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १७.३.१९८८ पासून लागू करण्यात आलेले आहेत. त्यामुळे ज्या पक्षकारांनी वरील व्यवहारातील दस्तऐवजावर दिनांक १७.३.१९८८ पासून सवलतीच्या दरापेक्षा जास्त मुद्रांक शुल्क भरले असेल, तर त्यांना भरलेले मुद्रांक शुल्क व सवलतीचे दराप्रमाणे देय असलेले मुद्रांक शुल्क या मधील फरकाची रक्कम परत करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. ही परताव्याची रक्कम मंजूर करतांना कोणती कार्यपध्दती अनुसराची याबाबत शासन पुढीलप्रमाणे मार्गदर्शनपर सूचना देत आहे.

२) (१) मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी अर्जदाराने या परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुना (अ) प्रमाणे त्या दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी दस्त सादर केला असेल तर त्या दुय्यम निबंधकाकडे अर्ज करावा.

(२) अर्जदारांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधीत दुय्यम निबंधकानी नमुना(ब) प्रमाणे अर्जदारांना अर्जाची पोहोच पावती द्यावी.

(३) दुय्यम निबंधकांनी प्राप्त झालेल्या अर्जाची नमुना (क) भाग-१ प्रमाणे छाननी करावी व अशी छाननी करताना दस्तऐवजांत नमूद केलेले मिळकतीचे मुल्य मुंबई मुद्रांक कायद्याच्या कलम ३२-अ(२) प्रमाणे बाजारभावाप्रमाणे आहे किंवा नाही याची पडताळणी करावी. त्याकरिता शिघ्रसिध्दगणकाचा आधार घेण्यात यावा.

बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन काढतांना प्रचलित सिध्दगणकाप्रमाणे १९८८ मधील बाजारभावाचे मुल्यांकन, सध्याच्या मुल्याकांच्या ८० टक्के व १८९ मधील बाजारभावाचे ९० टक्के विचारात घेण्यात यावे व त्यानुसार दस्तऐवजामधील मिळकतीचे बाजारमुल्य काढावे. त्यानंतर, दस्तऐवजामधील नवीन सवलतीच्या दराप्रमाणे देय असलेले मुद्रांक शुल्क निश्चित करून परताव्याची देय अशी रक्कम काढावी. ह्या कार्यवाहीनंतर परताव्याचे प्रकरण मुद्रांक जिल्हाधिकारी/मुद्रांक अधिक्षक मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावे.

४) मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी/मुद्रांक अधिक्षकांनी त्यांचेकडे प्रकरण प्राप्त झाल्यानंतर नमुना (क) मधील भाग-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रकरण तपासून परतावा मंजूरीचे आदेश पारित करावे.

५) मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी/मुद्रांक अधिक्षकांनी परतावा मंजूर झालेनंतर नमुना (ड) प्रमाणे आदेश काढावा व त्या आदेशासोबत नमुना (इ) प्रमाणे परतावा प्रमापक जोडावे. कोणत्याही परिस्थितीत मूळ दस्ताऐवज लेखी व अधिदान अधिकारी मुंबई / जिल्हा कोषागार/ उपकोषागार अधिकारी यांच्याकडे पाठवू नये.

६) मुद्रांकजिल्हाधिकाऱ्याने परतावा मंजूर केलयानंतर मूळ दस्तऐवजावर नमुना(प) प्रमाणे पृष्ठांकन (Endorsement) करावे व त्यावर मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करावी. त्याप्रमाणे त्या दस्तावर मंजूर केलेल्या परतावा रक्कमेच्या किंमती एवढया मुद्रांक पेपर/लेबलवर ‘‘रद्द’’(Cancelled) असा शिक्का उमटवावा व सदरचा

दस्त, दुय्यम निबंधकाकडे परत पाठवावा. दुय्यम निबंधकाकडे दस्त परत आल्यानंतर त्यांनी परतावाच्या रक्कमेची नोंद त्यांच्या कार्यालयातील अभिलेख म्हणून ठेवलेल्या दस्ताच्या प्रतीवर तद्वतच इतर संबंधित अभिलेखात करावी. ह्या कार्यवाहीनंतरच दस्त पक्षकारांना परत करण्याची पुढील कार्यवाही करावी.

७) अर्जदाराने करावयाचा अर्जाचा नमुना दुय्यम निबंधकानी मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी व मुद्रांक अधिक्षक मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयाच्या समोरील दर्शनी भागामध्ये जनतेच्या माहितीसाठी लावावा. दुय्यम निबंधकानी, विहीत केलेल्या नमुन्यातच परताव्याचे अर्ज स्वीकारावेत.

३) वर विहीत केलेल्या पध्दतीनुसार परताव्याची प्रकरणे हाताळली जातात किंवा नाही याचा आढावा संबंधित विभागाच्या नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांनी वेळोवेळी घ्यावेत व संबंधितांना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करावे. अशा प्रकरणांचा प्रत्येक महिन्याचा आढावा घेवून एकूण किती प्रकरणात किती रकमेचा परतावा मंजूर केला याचा त्याचया विभागातील मासिक अहवाल नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावा. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अहवालाचे परिक्षण करून एकत्रित अहवाल शासनाकडे प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत न चुकता पाठवावा.

४) बऱ्याच प्रकरणात पूर्ण मुद्रांक शुल्क भरले नाही या कारणास्तव दुय्यम निबंधकांनी असे दस्तऐवज अटकवून ते मुद्रांक जिल्हाधिकारी /मुद्रांक अधिक्षक, मुंबई यांचेकडे कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची दंडासहीत वसूली करण्याकरीता पाठविलेले आहेत. त्यामध्ये वरील प्रकारच्या व्यवहारातील दस्तऐवजाचा अंतर्भाव असण्याची शकयता आहे. मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी/मुद्रांक अधिक्षकांनी अशा सर्व दस्ताचा आढावा घेऊन त्या दस्तावर सवलतीच्या दराने मुद्रांक शुल्क निश्चित करावे व त्याची वसूली करून किंवा योग्य ते मुद्रांक भरले असल्यास तसे प्रमाणित करून ते दस्त संबंधित दुय्यम निबंधकांकडे पुढील कार्यवाहीसाठी तत्काळ पाठवावेत.

५) मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ३१ प्रमाणे जे दस्त अभिनिर्णीत केले आहेत व त्याप्रमाणे पक्षकाराने त्यावर मुद्रांक शुल्क दिले आहेत, परंतु पक्षकाराने अद्यापी सदरचा दस्त नोंदणीसाठी सादर केला नसेल तर अशा प्रकारणी अभिनिर्णयाप्रमाणे पक्षकारांनी सवलतीच्या दस्तऐवजी जास्तीचे मुद्रांक शुल्क दिले असल्यास परताव्यासाठी सदरचा दस्त संबंधित त्या नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदणीसाठी व परताव्याच्या रक्कमेसाठी सादर करणे आवश्यक राहील.

६)    मुद्रांक शुल्क परताव्याचा खर्च ''००३०- स्टॅम्पस् आणि रजिस्ट्रेशन फी-०२-स्टॅम्पस्-नॉन ज्युडीशियल(९०१) डीडक्ट रिफंड ह्या शिर्षकाखाली  दखवावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या तरतुदीतून भागवावा.

७)    हे शासन परिपत्रक वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या उनौ.संदर्भ क्र. ५७५/९०/व्यय-१०, दिनांक ६.६.१९९० व क्र. १७५/९०/कोष-४ दिनांक १५.६.१९९० अन्वये निर्गमित केले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सही/–**
**(के.के.विरशीद)**
**सहाय्यक सचिव**
**महसूल व वन विभाग**

**प्रति,**
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे.**
**नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई/ठाणे/पुणे/औरंगाबाद /नाशिक/ नागपूर**
**सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निबंधक**
**सर्व सह. जिल्हानिबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**मुद्रांक अधिक्षक मुंबई.**
**दुय्यम निबंधक मुंबई**
**महालेखापाल, मुंबई/नागपूर**
**संचालक लेखा व कोषागार मुंबई**
**अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/निवासी लेखा अधिकारी, मुंबई**
**सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/उपकोषागार अधिकारी**
**वित्त विकास मंत्रालय,**
**निवड नस्ती मं–१, कार्यालय, महसूल व वन विभाग.**